**नि. दिवाणी दावा क्र.** 46/2023
CNRNo.MHBU1700005932023
**कासाबाई वि. संतोष**

## निशाणी क्र.15 वरील आदेश.

**(दि.**01/07/2024**)**

**1.** प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रातील कलम 2 मध्ये मालमत्तेचे वर्णन समाविष्ट करुन दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगीसाठी दाखल केला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, नजरचुकीने दाव्यामध्ये मौजे हिरडव, ता. लोणार, जि. बुलडाणा येथील गट क्र. 181 मधील 0 हेक्टर 58 आर जमीन या जमिनीचा उल्लेख दाव्यामध्ये करणे राहुन गेले आहे. वादीने तिच्या अर्जामध्ये पुढे असे नमुद केले आहे की, जर प्रस्तुत दाव्यात अशा प्रकारची दुरुस्ती केल्यास दाव्यात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, जर दुरुस्तीची परवानगी नाकारल्यास वादीचे अपरिमीत व कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

**2.** प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात पुर्णपणे बदल होईल. त्यामुळे, दुरुस्ती अर्ज नामंजुर करावा.

## कारणमिमांसा

**3.** प्रस्तुतचा दावा वादीने वाद मिळकतीची सरस-निरस वाटणी होऊन तिचा हिस्सा पृथक करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. अद्याप प्रकरणामध्ये प्रतिवादीने कैफीयत दाखल केलेली नाही. अशा परीस्थितीत, प्रस्तुतचा दावा हा प्राथमिक अवस्थेत आहे. अर्जामध्ये नमुद कारण संयुक्तीक आहे. प्रस्तावित बदलामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. उलटपक्षी, अशा प्रकारे दाव्यामध्ये बदल/दुरुस्ती केल्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे नेमके स्वरुप त्याचबरोबर वाद विषय पटलावर आणला जाईल आणि त्यामुळे, त्या दोघांमधील वाद कायमचा संपुष्टात

आणण्यासाठी मदतच होईल. म्हणून अर्ज मंजुर करणे न्याय्य व योग्य आहे. म्हणून पुढील आदेश पारित करण्यात आला.

## आदेश

1 अर्ज मंजुर करण्यात येतो.

2. वादीने निर्धारित वेळेमध्ये दाव्यामध्ये दुरुस्ती करुन घेऊन दुरुस्त वादपत्र प्रकरणामध्ये दाखल करावे.

3. अर्जाचा खर्च दाव्याच्या निर्णयाच्या कलाप्रमाणे ठरविण्यात येईल.

(खुल्या न्यायालयात घोषित.)

दिनांक 01/07/2024

स्वा/- (आर. बी. हनवते)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
लोणार.